# ‘भूजल’विरोधात आंदोलनाचा पवित्रा

## अधिनियमाविरोधात दिंडोरी येथे बैठकीत निर्णय; सर्वपक्षीय शेतकऱ्यांची उपस्थिती

**लखमापूर, जि. नाशिक (सकाळ वृत्तसेवा) :** शासनाने नव्याने भूजल अधिनियम आणला असून, या निर्णयास शेतकऱ्यांनी विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत हरकती नोंदविण्यात येऊन वेळप्रसंगी आंदोलन व न्यायालयात जाण्याचा निर्णय दिंडोरी येथे झालेल्या सर्वपक्षीय शेतकऱ्यांच्या बैठकीत घेतला. ‘कादवा’चे अध्यक्ष श्रीराम शेटे, आमदार नरहरी झिरवाळ, माजी आमदार धनराज महाले, वाघाड महासंघाचे चंद्रकांत राजे, शहाजी सोमवंशी, शिवाजी पिंगळ, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे यांच्या उपस्थितीत बैठक झाली.



**दिंडोरी : भूजल अधिनियमासंदर्भात सर्वपक्षीय बैठकीप्रसंगी उपस्थित आमदार नरहरी झिरवाळ, श्रीराम शेटे व मान्यवर.**

या प्रश्नावर आमदार झिरवाळ, माजी आमदार धनराज महाले यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत लढा देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी एकत्रित हरकती घेण्यात येणार आहेत. वीजदरवाढ प्रस्तावित केली असून, श्रीराम शेटेंनी सांगत याबाबतही हरकत नोंदविण्याचे ठरविले. जायकवाडी धरण भरावे यासाठी ऊर्ध्व गोदावरी खोऱ्यात पाणी अडविण्यावर निर्बंध घातले आहेत, यावर नाराजी व्यक्त केली. हे निर्बंध उठविण्याची मागणी केली. गुजरातला वाया जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवून तूट भरून काढणे शक्य असून, त्यासाठी शासनाने कार्यवाही करण्याची मागणी केली. शेतकऱ्यांनीही जागरूक होत सर्व धरणांच्या लाभक्षेत्रात पाणीवाटप सोसायट्या स्थापन कराव्यात व पाणी परवानगी घेऊन आपला पाण्यावरील कायदेशीर हक्क प्रस्थापित करावा, असे ठरले. या वेळी कोपरगाव साखर कारखान्याचे संचालक सोमनाथ पाटील चांदगुडे, विश्वासराव देशमुख, आर. के. खांदवे, गोपीनाथ गांगुर्डे, बाळासाहेब कदम, जे. डी. केदार, मनोज ढिकले, नितीन गांगुर्डे आदींनी मनोगत व्यक्त केले. बैठकीचे संयोजक नरेश देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

# करंजवण, वाघाड धरण भरले

**लखमापूर, जि. नाशिक (सकाळ वृत्तसेवा) :** दिंडोरी तालुक्यातील सर्वांत जास्त साठा असलेले व येवला, मनमाड शहरासह शेतीला पाणीपुरवठा करणारे करंजवण धरण ९५ टक्के भरले असून, कादवा नदीपात्रात एक हजार ६०० क्यूसेक पाणी सोडले आहे. सध्या दिंडोरी तालुक्याच्या धरण क्षेत्रात चांगला पाऊस पडत असल्याने धरणांच्या साठ्यामध्ये वाढ होत आहे.



दिंडोरी तालुक्यातील वाघाड धरण १०० टक्के भरले असून, या धरणाच्या सांडव्यावरून एक हजार ४७७ क्यूसेक पाणी कोळवण नदीतून पालखेड धरणात जात आहे. पुणेगाव धरण ८८ टक्के भरले असून, या धरणामधूनही तीन हजार ६४५ क्यूसेक पाणी सोडले आहे. ओझरखेड धरण ७७ टक्के, तर तिसगाव धरणातील साठा ४१ टक्क्यांवर पोचला आहे. पालखेड धरणामध्ये करंजवण तसेच वाघाडचे पाणी येत असल्यामुळे पालखेड धरण ६१ टक्के भरले आहे. या धरणातून दोन हजार १२४ क्यूसेक पाणी कादवा नदीपात्रात व कॅनॉलद्वारे सोडले आहे. पालखेड धरणात गेल्या वर्षी ६६ टक्के असलेला साठा यंदा ६१ टक्के आहे. करंजवण धरणात ९५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे.

## गोशाळेत जनावरे पाठविण्याचे आवाहन

**मालेगाव :** तालुक्यात अद्याप भीषण दुष्काळी परिस्थिती आहे. जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी तमाम पशुपालकांना या स्थितीचा आढावा घेऊन गोरक्षा समितीच्या गोशाळेतर्फे आपल्या ताब्यातील जनावरे पालनपोषणासाठी गोशाळेत पाठवावीत. त्यांच्या चारा-पाण्याची व संगोपनाची सोय गोवंश रक्षा समिती गोशाळेत केली आहे, असे आवाहन सुभाष मालू यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### बिबट्याच्या हल्ल्यात ३६ मेंढ्या मृत्युमुखी

**विराणे :** अजंग (ता. मालेगाव) येथील तुळशीदास गबर काकुळते यांच्या मेंढ्यांच्या वाड्यात रात्री बिबट्याने हल्ला केल्याने ३६ मेंढ्या मृत्युमुखी पडल्या. अजंग-वडनेर रस्त्यालगत काकुळते यांची शेतात वस्ती आहे. वस्तीपासून हाकेच्या अंतरावर मेंढ्यांसाठी वाडा केला आहे. सुमारे शंभर मेंढ्या काकुळते यांच्याकडे आहेत. रात्री जोरदार पाऊस असल्याने सर्व कुटुंबीय घरात झोपले होते. अंधाराचा फायदा घेत बिबट्याने मेंढ्यांवर हल्ला चढविला. कुंपणावरून उडी घेत बिबट्याने वाड्यात प्रवेश करत हल्ला केल्याने ३६ मेंढ्या मृत्युमुखी पडल्या. वनाधिकारी व तलाठी अमित साने यांनी पंचनामा केला.

### ‘गिरणा’च्या साठ्यात सात टक्क्यांनी वाढ

**पिलखोड (ता. चाळीसगाव) :** चणकापूर, हरणबारी आणि केळझर धरणातून होणाऱ्या विसर्गामुळे गिरणा धरणाच्या साठ्यात आज दिवसाअखेर ७ टक्क्यांनी घसघशीत वाढ झाली. यामुळे धरण ३७ टक्के भरले आहे. आज सकाळी पुनद धरणातूनही विसर्ग सुरू करण्यात आला होता. शुक्रवारी (१७ ऑगस्ट) चणकापूर, हरणबारी आणि केळझर धरणे मिळून सुमारे १३ हजार क्यूसेकने विसर्ग गिरणात सुरू होता. शुक्रवारी सकाळी पुनद धरणातूनही विसर्ग सुरू करण्यात आला होता.

## राजमानेत ग्रामसेवकावर कारवाईचे आश्वासन

**मालेगाव (सकाळ वृत्तसेवा) :** राजमाने (ता. मालेगाव) येथील ग्रामसेवकाविरोधात ग्रामस्थांनी केलेल्या ठिय्या आंदोलनाची दखल घेत शनिवारी (ता. १८) गटविकास अधिकाऱ्यांनी कारवाईचे लेखी आश्वासन दिले.

ग्रामसभा घेण्याऐवजी महाराष्ट्र बंदची सबब पुढे करून टाळाटाळ करणाऱ्या ग्रामसेवक अतुल शिरसाठ यांच्यावर कारवाईसाठी शुक्रवारी (ता. १७) सरपंच व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थांनी तीन तास ठिय्या आंदोलन केले. अखेर ग्रामसभा घेत आंदोलन करणाऱ्यांनी विविध कामांची, शौचालय गैरव्यवहाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाईची मागणी केली. दरम्यान, गटविकास अधिकारी आनंद पिंगळे यांना शिष्टमंडळाने भेटून निवेदन दिले. या आंदोलनाची गंभीर दखल घेत संबंधितांची चौकशी करून बदली करण्याचे लेखी आश्वासन दिले. या वेळी पंचायत समितीचे उपसभापती अनिल तेजा उपस्थित होते. शिष्टमंडळात शेतकरी सहकारी संघाचे संचालक विठोबा छरंग, सरपंच कैलास बेहडे, ग्रामपंचायत सदस्य जुनेश कसेकर, भावलाल जाट, रणजित राठोड, काशीनाथ शिया, कोंडू धाडिवाळ, प्रताप छरंग, इंदल राठोड आदींसह ग्रामस्थ सहभागी होते.

# बिरसा मुंडा कृषिक्रांती, कृषी स्वावलंबन योजना, बोंड अळी नियंत्रणाबाबत चर्चा

## जळगाव जिल्हा परिषदेच्या कृषी समितीची सभा

**जळगाव (प्रतिनिधी) :** जिल्ह्यात बिरसा मुंडा कृषिक्रांती योजना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेसाठी येत्या ९ सप्टेंबरपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करायचे असून, त्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषद कृषी समितीच्या सभेत देण्यात आली.

सभेच्या अध्यक्षस्थानी नंदकिशोर महाजन होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संभाजी ठाकूर, जिल्हा कृषी अधिकारी ए. ए. कुलकर्णी तसेच तालुका कृषी अधिकारी या वेळी उपस्थित होते. अनुसूचीत जाती संवर्गासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविली जात आहे. अनुसूचीत जमाती संवर्गासाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना आहे. यात १०० टक्के अनुदानावर विहिरी, शेततळे अस्तरीकरण, कृषिपंप, वीजजोडणी, असे पॅकेज शेतकऱ्यांना दिले जात आहे.

यंदा स्वावलंबन योजनेकरिता सुमारे साडेसात कोटींचा निधी मिळाला आहे. हा निधी वेळेत खर्च करण्यासाठी संभाव्य लाभार्थी, त्यांचे प्रस्ताव मंजूर करणे आदी कार्यवाही करावी लागेल. योजनेत सहभागासाठी येत्या ९ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येतील. ते ऑनलाइन करायचे आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेतील कृषी अधिकाऱ्यांनी सभेत दिली.

दरम्यान, या सभेत कापूस पिकावरील गुलाबी बोंड अळीबाबतही चर्चा झाली. त्यात बोंड अळीला रोखण्यासाठी नियोजन समितीने निधी दिला असून, जिल्ह्यात मास ट्रॅपिंगची कार्यवाही सुरू आहे. कृषी विभागाची यंत्रणा यासंदर्भात लक्ष देऊन काम करीत असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संभाजी ठाकूर यांनी या सभेत दिली. यासह महिला बचत गटांना यंदा कृषी अवजारे दिली जातील. त्यासंबंधी कार्यवाही हाती घेतली असल्याचे सांगण्यात आले. इतर कृषी योजनांचा आढावादेखील या वेळी सादर करण्यात आला.

सकाळ अॅग्रोवन — आयोजित | महाधन नजर ठेवा उद्यावर — प्रायोजित

सकाळ अॅग्रोवन संवाद

**‘अॅग्रोवन’ साधणार शेतकऱ्यांशी संवाद**

**कार्यक्रम वेळापत्रक**

**मंगळवार, २१ ऑगस्ट २०१८ रोजी**

**विषय** – दर्जेदार टोमॅटो पीक व खत व्यवस्थापन
**वक्ते** – **मा. श्री. रावसाहेब पाटील,**
(प्रमुख केव्हीके, वाय.सी.एम.ओ. विद्यापीठ)
**स्थळ** – श्रीकृष्ण मंदिर सभागृह, गिरणारे, ता. जि. नाशिक
**वेळ** – सायं. ४ वा.

**गुरुवार, २३ ऑगस्ट २०१८ रोजी**

**विषय** – दर्जेदार कापूस लागवड व तंत्रज्ञान
**वक्ते** – **प्रा. पंकराज पाटील**
(वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख केव्हीके, धुळे)
**प्रा. जगदीश काथेपुरी** (शास्त्रज्ञ, केव्हीके, धुळे)
**स्थळ** – ग्रामपंचायत हॉल, नगरसूल, ता. येवला, जि. नाशिक
**वेळ** – सकाळी ९ वा.

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**